# जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शन

४० वे नाशिक जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शन दि.३०/१२/२०१४ ते दि.०१/०१/२०१५ पर्यंत ३ दिवस क. का. वाघ शिक्षण संस्था, अमृतधाम, पंचवटी, नाशिक या ठिकाणी महाराष्ट्र शासन (राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपुर) व जिल्हा परीषद (शिक्षण विभाग) नाशिक व विज्ञान अध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न होत आहे.

सदर विज्ञान प्रदर्शन आयोजन खर्चासाठी जिल्हा परिषद नाशिक यांच्या निधीतुन सन २०१३-१४ पासुन रू.४ लाख मंजुर करण्यात आले आहेत.

१. कृषी     २. ऊर्जा     ३. आरोग्य     ४. पर्यावरण     ५. संसाधने

**सहभाग :**

एन.सी.ई.आर.टी. नवी दिल्ली यांच्या संदर्भीय पत्रांन्वये विज्ञान प्रदर्शनात जिल्ह्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळेतील जि.प.शाळा, नगर परिषद शाळा, महानगर पालिका शाळा, खाजगी अनुदानीत व विना अनुदानीत शाळा, आश्रमशाळा, मिशनरी शाळा इ. पुढील दोन गटात विद्यार्थी सहभाग नोंदवितात. १. प्राथमिक स्तर (इयत्ता ८ वी पर्यंत) २. माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर (इयत्ता ९ वी ते १२) या विद्यार्थ्यांनी त्यांचे मार्गदर्शक शिक्षक आणि शाळेतील प्रयोगशाळा परीचर/सहायक यांच्या मदतीने वरील उपविषयावर आधारीत प्रदर्शनीय वस्तू/प्रतिकृती/वैज्ञानिक प्रकल्प तयार करतात.

**निवड प्रक्रिया :**

आदिवासी भाग असलेल्या तालुक्यातून प्राथमिक स्तरापर्यंतच्या गटातुन (इयत्ता ८ वी पर्यंत) चार (४) व माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून (इयत्ता ९ वी ते १२) चार (४) अशी एकुण आठ प्रदर्शनीय वस्तु आणि बिगर आदिवासी तालुक्यातुन प्राथमिक स्तरापर्यंतच्या गटातुन (इयत्ता ८ वी पर्यंत) तीन (३) व माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून (इयत्ता ९ वी ते १२) तीन (३) अशा एकुण सहा (६) प्रदर्शनीय वस्तुंची मुल्यमापनाच्या निकषानुसार जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड केली जाते.

याप्रमाणे नाशिक जिल्ह्यातील आदिवासी तालुक्यातुन ६४ वैज्ञानिक प्रकल्पासह १२८ विद्यार्थी सहभाग नोंदवितात व बिगर आदिवासी तालुक्यातुन ४८ वैज्ञानिक प्रकल्पासह ९६ विद्यार्थी सहभाग नोंदवितात.

त्याचप्रमाणे तालुका स्तरावरून अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्यासाठी प्राथमिक - १६ व माध्यमिक - १६ विभागातून शिक्षक सहभाग नोंदवितात. तसेच तालुका स्तरावरून १६ प्रयोगशाळा साहायक /परीचर निर्मित वैद्यानिक साधनासह सहभाग नोंदवितात.

लोकसंख्या शिक्षण प्रदर्शनासाठी तालुक्यातुन प्राथमिक १६ व माध्यमिक १६ शिक्षक सहभाग नोंदवितात.

(नाशिक तालुक्यातील ग्रामिण विभाग आदिवासी व नाशिक शहर स्वतंत्र गणल्यामुळे जिल्ह्यातील एक संख्या तालुक्याची अधिक वाढते.)

व्यवसाय मार्गदर्शन प्रदर्शनासाठी स्वतंत्र दालनात साहित्य मांडणी केली जाते.

तालुका स्तरावरून जिल्हा स्तरावर सुमारे ४०० विद्यार्थी/शिक्षक यांनी क.का.वाघ शिक्षण संस्था, अमृतधाम, पंचवटी, नाशिक येथे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदवतील.

विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन दिनांक ३०/१२/२०१४ रोजी सकाळी १०:३० वाजता मा.ना.सौ.विजयश्रीताई रत्नाकर चुंबळे (अध्यक्षा, जिल्हा परिषद, नाशिक), मा.श्री.सुखदेव बनकर (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद नाशिक), मा.श्री.भगवान सूर्यवंशी (शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक), मा.श्री.बाळासाहेब देवराम वाघ (अध्यक्ष, क.का.वाघ शिक्षण संस्था, नाशिक) इ. मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेच्या प्रांगणात संपन्न होणार आहे.

वैज्ञानिक विचारांचा प्रसार होणाच्या दृष्टीने कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था **'दिशा मांगल्याच्या'** ही स्मरणिका मा.श्री.प्रकाश बाळासाहेब वडजे (उपाध्यक्ष तथा सभापती, अर्थ व बांधकाम समिती, जिल्हा परिषद, नाशिक), मा.सौ.किरण पंढरीनाथ थोरात (सभापती, शिक्षण व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, नाशिक), मा.श्री.दत्तात्रय जगताप (विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक) व मा.श्री.बाळासाहेब देवराम वाघ (अध्यक्ष, क.का.वाघ शिक्षण संस्था, नाशिक) इ. मान्यवरांच्या शुभहस्ते दिनांक ०१/०१/२०१५ रोजी समारोपप्रसंगी प्रकाशीत होणार आहे.

तीन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनात नाशिक जिल्ह्यातील सर्व माध्यमिक, उच्च माध्यमिक मराठी/इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक असे साधारण ६,००० विद्यार्थी/शिक्षक भेट देतील असे कळविण्यात आले आहे.